सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## विशेष सखोल पुनरीक्षणाला सहकार्य करावे; राजकीय पक्षांना आवाहन

**अमरावती :** जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. अद्यापपर्यंत 3 लाख 95 हजार मतदारांनी आवश्यक असलेला फॉर्म भरून दिलेला नाही. परीणामी मतदारयादीतून हे मतदार वगळले जाणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतदार शोधून त्यांच्याकडून फॉर्म जमा करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले. जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत राजकीय पक्षांची बैठक पार पडली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी जिल्ह्यातील विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# अमरावतीच्या मुथुट गोल्ड लोन फायनान्स मध्ये अनियमितता!

## कोटींचे सोने आणि रकमेवर डल्ला : शेकडो ग्राहकांचा संताप, तक्रारींचा ओघ, अमरावतीच्या मुथुट गोल्ड लोन फायनान्स मध्ये अनियमित्ता - महत्त्वाचा अधिकारी फरार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अमरावती :** अमरावतीतील विमाको टॉवर्स येथील मुथुट फिनकॉर्प फायनान्स कंपनीच्या शाखेतील शाखेतील एका अधिकाऱ्यावर कोट्यवधी रुपयांचे सोने आणि रोख रक्कम घेऊन फरार झाल्याचा गंभीर आरोप गुंतवणूकदारांनी केला आहे. या आरोपामुळे मंगळवारी दुपारपासून शाखेत मोठा गोंधळ उडाला असून, शेकडो ग्राहकांनी संताप व्यक्त केला.

मुथूट गोल्ड लोन फायनान्स मध्ये अनिमितता झाल्याचे आरोप ग्राहकांनी लावला आहे. मंगळवारी सुमारे 20 ते 25 हून अधिक ग्राहक गहाण ठेवलेले सोने सोडविण्यासाठी किंवा कर्जासंदर्भात चौकशी करण्यासाठी शाखेत पोहोचले होते. मात्र, येथील महत्त्वाचा अधिकारी फरार झाल्याचे तसेच अनेक ग्राहकांना देण्यात आलेल्या पावत्या बनावट असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिल्याचा दावा ग्राहकांनी केला.अनेकांनी आपली आयुष्यभराची कमाई किंवा हक्काचे सोने या कंपनीत गहाण ठेवून कर्ज घेतले होते. प्रत्यक्षात सोने सोडविण्यास गेलेल्या



### वैयक्तिक स्कॅनरचा वापर; पैसे केले वळते

तपासणीदरम्यान, व्यवस्थापक याने गोल्ड लोनच्या मोबदल्यात गुंतवणूकदारांनी भरलेले हप्ते स्वतःच्या वैयक्तिक स्कॅनरवर घेतल्याचे समोर आले. तसेच ग्राहकांच्या मोबाइलवर पैसे जमा झाल्याचे मेसेज येत असले, तरी ते पैसे कंपनीच्या खात्यात जमा न होता अन्यत्र कुठेतरी वळते झाल्याचे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले.




मुथुट फायनान्सचे एरिया मॅनेजर आणि केरळ येथील मुख्य कार्यालयाच्या प्रतिनिधींशी संपर्क साधण्यात येत आहे. नेमकी किती कोटींची अफरातफर झाली, हे फायनान्सचे ऑडिट पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल.
**संजय खताळे,**
एसीपी, राजापेठ

### पोलिस ठाण्यात तक्रारी घेण्याचे काम सुरू

घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संतप्त नागरिकांना शांत करत पोलिस ठाण्यात बोलावले. आशिष क्षीरसागर, श्याम डेहनकर, मोहन निहाटकर यांच्यासह 25 ते 30 हून अधिक नागरिकांनी पोलिस ठाण्यात धाव घेत लेखी तक्रारी दिल्या आहेत. यामध्ये काहींचे १५ लाखांपर्यंतचे सोने अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, उशिरा सायंकाळपर्यंत पोलिस ठाण्यात नागरिकांची प्रचंड गर्दी कायम होती.

## मालमत्ता कर वसुलीला अधिक गती द्या; उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी नियोजन करा – आयुक्त



**अमरावती :** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी आज मंगळवार (दि. ४ ऑगस्ट) महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कर वसुलीची सद्यस्थिती, विभागनिहाय उद्दिष्टपूर्ती, प्रलंबित थकबाकी, मोठ्या करदात्यांकडील वसुली, कर संकलनातील अडचणी तसेच महसूल वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीत आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुलाचा प्रमुख स्रोत असल्याचे सांगत, निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक विभागाने दैनंदिन व साप्ताहिक वसुलीचे उद्दिष्ट निश्चित करून त्याचा नियमित आढावा घ्यावा, तसेच प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रलंबित कर वसुलीकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मोठ्या थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना देताना आयुक्तांनी संबंधितांना प्रत्यक्ष भेटी घेणे, नोटिसा बजावणे, नियमित पाठपुरावा करणे आणि आवश्यकतेनुसार महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले. ज्या प्रकरणांमध्ये दीर्घकाळापासून थकबाकी आहे, त्यांची स्वतंत्र यादी तयार करून प्राधान्याने वसुली करावी, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांना कर भरणे अधिक सुलभ व्हावे यासाठी ऑनलाइन सुविधांचा अधिकाधिक प्रचार करावा, विविध माध्यमांतून जनजागृती करावी आणि करदात्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. कर भरण्यासाठी नागरिकांना सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशा प्रकारे संवाद वाढविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. बैठकीत विभागातील अधिकाऱ्यांनी विभागनिहाय कर वसुलीचा आढावा, प्रलंबित प्रकरणे, मागील वर्षाच्या तुलनेतील प्रगती, महसूल वाढीसाठी आखलेले नियोजन आणि येणाऱ्या अडचणी याबाबत सादरीकरण केले. विविध विभागांतील कामगिरीचा तुलनात्मक आढावा घेत आयुक्तांनी अपेक्षित प्रगती न झालेल्या क्षेत्रांमध्ये विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या.

तसेच, मालमत्ता कराच्या नोंदी अद्ययावत ठेवणे, नव्याने बांधलेल्या मालमत्तांचा कर आकारणी प्रक्रियेत समावेश करणे, मालमत्तांची माहिती डिजिटल स्वरूपात अद्ययावत करणे आणि महसूल वाढीसाठी उपलब्ध सर्व पर्यायांचा प्रभावी वापर करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. बैठकीच्या शेवटी आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करून मालमत्ता कर वसुलीचे निर्धारित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. महसूल वाढल्यास शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सेवांच्या विकासकामांना अधिक गती देता येईल, यासाठी मालमत्ता कर वसुली अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

या बैठकीत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, मुख्यलेखाधिकारी शिल्पा पवार, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी वैशाली गाठे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, मनोज शहाळे, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, प्रविण ठाकरे, अतिक्रमण पथक प्रमुख अजय बन्सेले, हरीष संतोसिया, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना युरोप, चीन दौऱ्याची संधी

## २० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ५ ऑगस्ट

**अमरावती :** कृषी विस्तार कार्यक्रमांतर्गत वर्ष २०२६-२७ साठी राज्यातील शेतकऱ्यांच्या विदेश अभ्यास दौऱ्यांचे आयोजन राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी या परदेश अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी २० ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेंतर्गत जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांना युरोप आणि चीन या देशांतील शेतीविषयक प्रगत तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. जागतिक पातळीवर शेती क्षेत्रात होत असलेले बदल आणि नव्याने विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचवणे, हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. या दौऱ्यात परदेशातील कृषी शास्त्रज्ञ व तेथील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, शेतीविषयक विविध संस्था आणि आधुनिक शेतांना प्रत्यक्ष भेटी देणे, परदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकरी आपल्या उत्पन्नात कशी वाढ करू शकतात, याचे प्रात्यक्षिक व ज्ञान मिळवणे या बाबींचा समावेश राहणार आहे.

परदेश अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी लाभार्थी स्वतः शेतकरी असावा. ॲग्रीस्टॅक शेतकऱ्याकडे 'फार्मर आयडी' असणे आवश्यक आहे. शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असावे, याबाबतचे स्वयंघोषणापत्र जोडणे आवश्यक आहे. एका शेतकरी कुटुंबामधून केवळ एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. सहलीच्या दिवशी शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे आणि शेतकऱ्याकडे वैध पासपोर्ट असणे आवश्यक आहे. शेतकरी कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी अथवा खाजगी संस्थेत नोकरीला नसावा. अर्जासोबत ओळखपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

## मनपा आयुक्तांच्या नावे संशयास्पद कॉल वा मेसेज; सायबर पोलिसांकडे करा तक्रार

### डॉ. गोंदावले यांचे आवाहन; ६६६२४२७८१०० या क्रमांकावरून पैशांची मागणी

**अमरावती :** महानगरपालिका वर्तुळातून एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, थेट मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या नावाचा गैरवापर करून ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न केला जात आहे. अज्ञात सायबर भामट्यांकडून नागरिकांना व्हॉट्सॲपवर मेसेज पाठवून पैशांची मागणी केली जात आहे. या प्रकारामुळे पालिका प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

सायबर गुन्हेगारांनी ६६६२४२७८१०० या आंतरराष्ट्रीय (थायलंड कोड) व्हॉट्सॲप क्रमांकावरून मनपा आयुक्तांच्या नावे महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना संदेश पाठवून वेगवेगळ्या कारणांसाठी तातडीने पैशांची किंवा आर्थिक मदतीची मागणी केली. हा प्रकार वेळीच निदर्शनास आला.

### थेट सायबर सेलकडे तक्रार करा : डॉ. मंगेश गोंदावले

या गंभीर प्रकरणाची दखल घेत अमरावती मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी नागरिकांना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. जर कोणालाही ६६६२४२७८१०० किंवा अशाच प्रकारच्या इतर कोणत्याही संशयास्पद क्रमांकावरून माझ्या नावाने मेसेज किंवा कॉल आल्यास, त्यावर अजिबात विश्वास ठेवू नका. कोणत्याही परिस्थितीत कुणालाही ऑनलाइन पैसे पाठवू नका. अशा संशयास्पद संदेशांची शहानिशा करा आणि तत्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात किंवा सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार नोंदवा, असे आवाहन आयुक्त डॉ. गोंदावले यांनी केले आहे. डॉ. मंगेश गोंदावले, आयुक्त, मनपा यांनी सांगितलं.

**मनपा प्रशासनाचा तत्काळ खुलासा :** हा प्रकार उघडकीस येताच अमरावती महानगरपालिका प्रशासनाने तत्काळ सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. मनपा आयुक्तांच्या वतीने किंवा त्यांच्या नावाने कोणत्याही व्यक्तीकडे व्हॉट्सॲप अथवा इतर कोणत्याही सोशल मीडिया माध्यमातून पैशांची किंवा कोणत्याही आर्थिक मदतीची मागणी केली जात नाही, असा स्पष्ट खुलासा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा खोट्या मेसेजेसला बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

सहायक आयुक्त विवेक देशमुख यांना विदेशातून पैशासाठी कॉल आला होता. यासंदर्भात शहानिशा केली, तेव्हा तो फ्रॉड कॉल होता. यासंदर्भात सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदविली.

## 'जागतिक स्तनपान सप्ताह'निमित्ताने जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन

**अमरावती :** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि जिल्हा महिला व बाल कल्याण विभागाच्यावतीने १ ते ७ ऑगस्ट २०२६ दरम्यान विविध उपक्रमांद्वारे जिल्ह्यात 'जागतिक स्तनपान सप्ताह' साजरा करण्यात येत आहे.

आईच्या दुधातूनच जन्मानंतर पहिल्या एका तासात बालकास स्तनपान सुरु करणे तसेच जन्मापासून पहिल्या महिन्यापर्यंत केवळ आईचे दूध देणे बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असते. आईच्या दुधामुळे बालकाची रोगप्रतिकार शक्ती वाढते, आजारांपासून संरक्षण होते , मानसिक व बौद्धिक विकासाला चालना मिळते. 'शाश्वत जीवनाच्या सुरुवातीसाठी स्तनपान : जे प्रभावी आहे ते अधिक बळकट करा' ही यावर्षी जागतिक स्तनपान सप्ताहाची संकल्पना आहे. यानुसार स्तनपानाच्या माध्यमातून नवजात बालकास आयुष्याची सर्वोत्तम सुरुवात मिळावी तसेच ९ ते ५९ महिन्यापर्यंतच्या बालकांना 'अ' जीवनसत्व पुरक आहार देण्याबाबतही जिल्ह्यात आयोजित होणाऱ्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

**जिल्ह्यात विविध उपक्रम**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण परिसे यांच्या मार्गदर्शन आणि जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. पराग राठोड यांच्या नियोजनात जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्ताने जिल्हा रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालये,प्राथमिक आरोग्य केंद्र ,आयुष्यमान आरोग्य मंदिरे तसेच गाव पातळीवर आरोग्य कर्मचाऱ्यांचे पुनश्चर्या प्रशिक्षण,गर्भवती व स्तनदा मातांसाठी समुपदेशन विषयक कार्यशाळा, माता-पालक बैठका, शालेय स्तरावरील प्रश्नमंजुषा,निबंध व चित्रकला स्पर्धा तसेच स्नपानास पोषक वातावरण निर्मितीस पोषक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## 10 ऑगस्ट रोजी 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा'

**अमरावती :** संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) एनएसएस हॉलमध्ये येत्या १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्ह्यातील सर्व आयटीआयच्या विद्यार्थ्यांकरिता 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आयटीआय मध्ये फिटर,टर्नर,इलेक्ट्रेशियन,मॅकनिस्ट,टूल डाय मेकर, मशीन मोटर व्हेईकल, डिझेल मशीन, इलेक्ट्रेशियन, वेल्डर (गॅस/इलेक्ट्रीक),ड्रेस-मेकिंग, सुईंग –टेक्नॉलॉजी,फॅशन टेक्नॉलॉजी या विषयांत उत्तीर्ण व अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या तसेच पदवी व पदविका धारक (मेकॅनिकल) उमेदवारांसाठी या राष्ट्रीय भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नामांकित कंपन्यांमार्फत शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.उमेदवारांनी या भरती मेळाव्यासाठी येताना सोबत बायोडेटा आणि आवश्यक कागदपत्रांच्या छायापत्री आणणे आवश्यक आहे. सर्व इच्छूक उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपसंचालक तसेच सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र , संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांसह गढूळ पाण्यात बसून अनोखे आंदोलन

## साईनगरमधील आंदोलनाने प्रशासन हादरले; राष्ट्रवादीचे पदाधिकाऱ्याचा पुढाकार

प्रतिनिधी ५ ऑगस्ट



**दर्यापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे जिल्हा उपाध्यक्ष शुभम होले यांनी आज आपल्या वाढदिवसाच्या दिवशी एक अनोखे आंदोलन सुरू करत दर्यापूर शहरातील साईनगर भागातील जिल्हा परिषद शाळेच्या आवारात साचलेल्या गढूळ पाण्यातच उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे.

माहितीनुसार, या परिसरात गेल्या २० ते २५ वर्षांपासून गढूळ व साचलेल्या पाण्याची समस्या कायम असून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. या गंभीर समस्येकडे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा आरोप शुभम होले यांनी केला आहे. सध्या सुरू असलेल्या या आंदोलनाला एक तासाहून अधिक काळ उलटून गेला असतानाही प्रशासनाचा एकही वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झालेला नाही, अशी माहिती आंदोलनकर्त्यांकडून देण्यात आली आहे. आंदोलनस्थळी साचलेल्या पाण्यात मोठे साप, इंचू तसेच इतर धोकादायक प्राणी आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, याच जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात चार अंगणवाड्या कार्यरत असून त्यामध्ये लहान चिमुकले विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा परिस्थितीतही प्रशासनाने या समस्येकडे दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त होत आहे.

'विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या या परिस्थितीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असह्य झाले आहे. त्यामुळेच आम्हाला गढूळ पाण्यात उतरून आंदोलन करावे लागत आहे,' असे शुभम होले यांनी सांगितले.

या अनोख्या आंदोलनामुळे साईनगर परिसरात मोठी गर्दी जमा झाली असून नागरिकांकडूनही प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. आता प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करते का, याकडे संपूर्ण दर्यापूरचे लक्ष लागले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.-MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135